# परिशिष्ट (नमुना-2)

जा.क्र.जिपनां/शिअप्रा/प्रा-5क/ 2024 1657
कार्यालय शिक्षण विभाग (प्रा.)
जिल्हा परिषद, नांदेड
दिनांक:- 28 FEB 2025

प्रति,
मुख्याध्यापक,
**पॅनेसिया इंटरनॅशनल स्कुल, जानापूरी**
**ता. लोहा जि.नांदेड**

विषय:- **बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजार्थ, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, 2011 याच्या नियम 11, पोट नियम(4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी **दि.30.01.2025** या आधारे मी शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद, नांदेड **दिनांक 08.10.2024** पासून **दिनांक 07.10.2027** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता पहिली ते आठवी स्वयंअर्थसहाय्यित शाळा (माध्यम- इंग्रजी )** करिता **पॅनेसिया इंटरनॅशनल स्कुल, जानापूरी, ता. लोहा जि.नांदेड** शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.**

1-मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलगता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

2-बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम,2009(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हकक नियम, 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.

3-शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांाा मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

4-परिच्छेद 3 निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी परिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

5-संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

6-कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

7-(एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणतयाही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणतयाही बालकास शारीरिक शिक्षा किंवा माासिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण हाईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणंखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि.

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

8- शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

9-शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहत केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

10-शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ:-. **55600.00** चौ.मीटर.
- एकूण बांधकाम क्षेत्र : **29260.00 चौ.मीटर**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ:- **26340.00** चौ.मीटर
- वर्गखोल्यांची संख्या:-**35**
- कार्यालय -नि-भांडार-नि-मुख्याध्यापकांची खोली :- **05**
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल :- **आहे**
- पिण्याच्या पाण्याची सुविधा:-**आहे**
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर :-**लागू नाही**
- अध्यापन अध्ययन साहित्य /खेळ व क्रीडाविषयक सामग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता:-**आहे**
- वाचन साहित्य विनायासास उपलब्ध :- **आहे**

11-मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेंच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

12-शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13-शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम,1860(1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

14-शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

15-शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

16-तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक **27150405204** असा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

17-शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तींची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामाकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

18-संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

19-जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

20-तपासणी अधिकारी, यांनी दिलेल्या तपासणी अहवालाच्या अधिन राहून.

(डॉ.सविता बिरगे)
**शिक्षणाधिकारी (प्रा.)**
जिल्हा परिषद,नांदेड

**प्रतिलिपी:-**

1.मा.शिक्षण संचालक (प्रा.) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे-1 यांना सविनय सादर.
2.मा.शिक्षण उपसंचालक लातूर विभाग लातूर यांना सविनय सादर.
3.गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती **लोहा** यांना माहितीस्तव.
4.अध्यक्ष/सचिव **प्राचित शिक्षण संस्था, नांदेड** यांना महितीस्तव.

(डॉ.सविता बिरगे)
**शिक्षणाधिकारी (प्रा.)**
जिल्हा परिषद,नांदेड